SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000 PGBUTR- 0231 2609296/9139,
www.unishivaji.ac.in, pgbutr@gmail.com
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,
महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९००० दूरध्वनी पी. जी. बी. यु. टी. आर. - ०२३१ २६०९२९६/९१३९,
www.unishivaji.aic.in, pgbutr@gmail.com

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी विद्यापीठ/पीजी.बीयुटीआर/पीएच.डी./9667 दि. 07 OCT 2026

प्रति,

अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,
तथा अध्यक्ष, संशोधन सल्लागार समिती
सर्व पदव्युत्तर विभाग/अभ्यासक्रम,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:— पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रगती अहवालांचे सादरीकरण ज्या—त्या सहामाहीमध्ये पूर्ण करुन घेण्यासंदर्भात

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे नावनोदंणी दिनांकापासून प्रत्येक सहा महिन्यात प्रगती अहवालाचे सादरीकरण करुन घेऊन, पीजीबीयुटीआर विभागाच्या संगणक प्रणालीमध्ये तसा अहवाल अपलोड करणे आवश्यक आहे. तथापि असे निदर्शनास येत आहे की, संबंधित अधिविभागातील संशोधन सल्लागार समितीकडून त्या—त्या सहामाही कालावधीत पीएच.डी. विद्यार्थ्यांच्या प्रगती अहवालाचे सादरीकरण करुन घेतले जात नाही. तसेच काही वेळा दोन/तीन किंवा त्यापेक्षा जास्त सहामाही प्रगती अहवालाचे सादरीकरण, एकाच वेळी आयोजित करण्यात येवून, पीजीबीयुटीआर संगणक प्रणालीत प्रगती अहवाल अपलोड करण्यात येतात.

तेंव्हा पीएच.डी. विद्यार्थ्यांच्या सहामाही प्रगती अहवलाचे सादरीकरण त्या—त्या सहामाही कालावधी मध्ये पूर्ण करुन, पीजीबीयुटीआर संगणक प्रणालीमध्ये सहामाही प्रगती अहवाल अपलोड करण्यात यावेत. सदरचे पत्र सर्व पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव

प्रत:—

१. मा.प्र—कुलगुरु व कुलसचिव कार्यालय मा.संचालक
२. प्र—अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा
३. अध्यक्ष, सर्व अभ्यासमंडळे
४. इंटरनेट विभाग यांना सदरचे पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी